मुख्यमंत्री सचिवालय
ई-ऑफीस क्रमांकः 9103752
दिनांकः 1 OCT 2025

सत्यमेव जयते

**मुख्यमंत्री सचिवालय**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*
दिनांक : 1 OCT 2025

**विषय :- १५० दिवसांचा ई गव्हर्नन्स कार्यक्रमास मुदतवाढ देणे बाबत.**

संदर्भ :- १ सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र. संकीर्ण १७२५/प्र.क्र.१२६ / मा.तं. दिनांक ३०.०५.२०२५
२. मुख्यमंत्री सचिवालयाचे पत्र क्रमांक ई-८७२७५५९, दिनांक २२.०७.२०२५
३. मुख्यमंत्री सचिवालयाचे पत्र क्रमांक ई-९०३७८३७, दिनांक १९.०९.२०२५

**महोदय / महोदया,**

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, विविध स्तरावरील प्रशासनिक कामकाज हे अधिक लोकाभिमुख, गतिमान व पारदर्शक व्हावे याकरिता दिनांक ७ मे, २०२५ ते २ ऑक्टोबर, २०२५ या कालावधीत राज्यात १५० दिवसांचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. सदर कार्यक्रमांतर्गत 'ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. उपरोक्त संदर्भांकीत पत्रांन्वये ई- गव्हर्नन्स कार्यक्रमात सहभागी कार्यालयांना कार्यक्रमाचे वेळापत्रक व मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. सदर वेळापत्रकान्वये सर्व सहभागी कार्यालयांनी दिनांक २ ऑक्टोबर, २०२५ रोजीपर्यंत सादरीकरण व माहिती सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते.

२. परंतु, राज्यातील अनेक जिल्ह्यांतील पूरस्थिती विचारात घेता, कार्यक्रमात सहभागी जिल्हा व विभाग पातळीवरील बरीचशी कार्यालये तातडीची मदत, पुनर्वसन, शेतीचे पंचनामे इत्यादी कामामध्ये व्यस्त आहेत, तसेच नजीकच्या काळात येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीशी संबंधीत कामकाज अनेक शासकीय कार्यालयांमार्फत हाताळण्यात येत आहे.

३. १५० दिवसांचा कार्यक्रम हा स्पर्धात्मक कार्यक्रम असल्यामुळे सर्व सहभागी कार्यालये पूर्ण क्षमतेने कार्यक्रमात सहभागी होणे अपेक्षित असल्यामुळे मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक ३० सप्टेंबर, २०२५ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत १५० दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत ई गव्हर्नन्स कार्यक्रमास दिनांक १० जानेवारी, २०२६ पर्यंत म्हणजे १०० दिवसांची मुदतवाढ देण्याबाबत घोषणा केली आहे.

४. त्यानुसार, ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमाचे सुधारीत वेळापत्रक सोबतच्या जोडपत्रात दर्शविल्याप्रमाणे निश्चित करुन देण्यात येत आहे. त्यानुसार सर्व सहभागी कार्यालयांनी याबाबतची नोंद घेऊन उचित कार्यवाही करावी.

**(डॉ. श्रीकर परदेशी)**
**मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव**

**प्रति :-**

१. मा. मुख्य सचिव,
२. मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,

३. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव (सर्व मंत्रालयीन विभाग)
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा), मुंबई
५. महासंचालक, यशदा, पुणे,
६. सर्व आयुक्तालये व संचालनालये,
७. सर्व मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे, संस्था, अभिकरणे व कंपन्या,
८. सर्व विभागीय आयुक्त कार्यालये,
९. सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरिक्षक / उप महानिरिक्षक यांचे कार्यालये,
१०. सर्व पोलीस आयुक्तालये,
११. सर्व जिल्हाधिकारी कार्यालये,
१२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा,
१३. सर्व महानगर पालिका आयुक्त कार्यालये,
१४. सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक,
१५. भारतीय गुणवत्ता परिषद, नवी दिल्ली.

"जोडपत्र"

**"विविध स्तरावर निवडावयाच्या उत्कृष्ट कार्यालयांच्या निवडीचे वेळापत्रक"**

| **१. जिल्हाधिकारी कार्यालये निवडीचे वेळापत्रक** | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | सादर करणारी कार्यालये / अधिकारी | अंतिम सादरीकरण जमा करावयाचा दिनांक | निवड करणारे अधिकारी | निकाल सादर करावयाचा दिनांक |
| १. | सर्व जिल्हाधिकारी कार्यालये | १०.०१.२०२६ | संबंधित विभागीय आयुक्त (उत्कृष्ट २ जिल्हाधिकारी कार्यालय निवड करणे) | १४.०१.२०२६ |
| २. | प्रत्येक विभागीय आयुक्त उत्कृष्ट २ जिल्हाधिकारी कार्यालय राज्यस्तरावरील निवडीसाठी QCI ला सादर करणे (एकूण १२) | १४.०१.२०२६ | Quality Council of India<br>(राज्य स्तरावर उत्कृष्ट ५ जिल्हाधिकारी कार्यालयांची निवड करणे) | २३.०१.२०२६ |

| **२. जिल्हा परिषद कार्यालये निवडीचे वेळापत्रक** | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | सादर करणारी कार्यालये / अधिकारी | अंतिम सादरीकरण जमा करावयाचा दिनांक | निवड करणारे अधिकारी | निकाल सादर करावयाचा दिनांक |
| १. | सर्व जिल्हा परिषद<br>(मुख्य कार्यकारी अधिकारी) | १०.०१.२०२६ | संबंधित विभागीय आयुक्त (उत्कृष्ट २ जिल्हा परिषदेची निवड करणे) | १४.०१.२०२६ |
| २. | प्रत्येक विभागीय आयुक्त उत्कृष्ट २ जिल्हा परिषद कार्यालय राज्यस्तरावरील निवडीसाठी QCI ला सादर करणे (एकूण १२) | १४.०१.२०२६ | Quality Council of India<br>(राज्य स्तरावर उत्कृष्ट ५ जिल्हा परिषद कार्यालयांची निवड करणे) | २३.०१.२०२६ |

| ३. जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालये निवडीचे वेळापत्रक | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | सादर करणारी कार्यालये / अधिकारी | अंतिम सादरीकरण जमा करावयाचा दिनांक | निवड करणारे अधिकारी | निकाल सादर करावयाचा दिनांक |
| १. | सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालये | १०.०१.२०२६ | संबंधित परिक्षेत्रीय पोलीस महानिरिक्षक / उप महानिरिक्षक) (उत्कृष्ट २ जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालय निवड करणे) | १४.०१.२०२६ |
| २. | प्रत्येक परिक्षेत्रीय पोलीस महानिरिक्षक / उप महानिरिक्षक उत्कृष्ट २ जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालय राज्यस्तरावरील निवडीसाठी QCI ला सादर करणे (एकूण १६) | १४.०१.२०२६ | Quality Council of India (राज्य स्तरावर उत्कृष्ट ५ जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालयांची निवड करणे) | २३.०१.२०२६ |

| ४. महानगरपालिका कार्यालये निवडीचे वेळापत्रक | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | सादर करणारी कार्यालये / अधिकारी | अंतिम सादरीकरण जमा करावयाचा दिनांक | निवड करणारे अधिकारी | निकाल सादर करावयाचा दिनांक |
| १. | सर्व महानगरपालिका कार्यालये (एकूण २९) | १०.०१.२०२६ | प्रधान सचिव, नगर विकास-२ (उत्कृष्ट १० महानगरपालिका कार्यालये निवड करणे) | १४.०१.२०२६ |
| २. | प्रधान सचिव, नगर विकास-२ (उत्कृष्ट १०) महानगरपालिका कार्यालये राज्यस्तरावरील निवडीसाठी QCI ला सादर करणे. | १४.०१.२०२६ | Quality Council of India (राज्य स्तरावर उत्कृष्ट ५ महानगरपालिका कार्यालयांची निवड करणे) | २३.०१.२०२६ |

| ५. विभागीय आयुक्त कार्यालये निवडीचे वेळापत्रक | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | सादर करणारी कार्यालये / अधिकारी | अंतिम सादरीकरण जमा करावयाचा दिनांक | निवड करणारे अधिकारी | निकाल सादर करावयाचा दिनांक |
| १. | सर्व विभागीय आयुक्त कार्यालये (एकूण ६) | १०.०१.२०२६ | अपर मुख्य सचिव (महसूल) (उत्कृष्ट ३ विभागीय आयुक्त कार्यालये निवड करणे) | १४.०१.२०२६ |
| २. | अपर मुख्य सचिव (महसूल ) (उत्कृष्ट ३ विभागीय आयुक्त कार्यालये राज्यस्तरावरील निवडीसाठी QCI ला सादर करणे) | १४.०१.२०२६ | Quality Council of India (राज्य स्तरावर उत्कृष्ट २ विभागीय आयुक्त कार्यालयाची निवड करणे) | २३.०१.२०२६ |

| ६.पोलीस आयुक्तालये निवडीचे वेळापत्रक | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | सादर करणारी कार्यालये / अधिकारी | अंतिम सादरीकरण जमा करावयाचा दिनांक | निवड करणारे अधिकारी | निकाल सादर करावयाचा दिनांक |
| १. | सर्व पोलीस आयुक्त (एकूण १२) | १०.०१.२०२६ | अपर मुख्य सचिव (गृह) (उत्कृष्ट ६ पोलीस आयुक्त कार्यालये निवड करणे) | १४.०१.२०२६ |
| २. | अपर मुख्य सचिव (गृह) (उत्कृष्ट ६ पोलीस आयुक्त कार्यालये राज्यस्तरावरील निवडीसाठी QCI ला सादर करणे) | १४.०१.२०२६ | Quality Council of India (राज्य स्तरावर उत्कृष्ट ३ पोलीस आयुक्त कार्यालयांची निवड करणे) | २३.०१.२०२६ |

| ७.परिक्षेत्रीय पोलीस महानिरिक्षक / उप महानिरिक्षक कार्यालये निवडीचे वेळापत्रक | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | सादर करणारी कार्यालये / अधिकारी | अंतिम सादरीकरण जमा करावयाचा दिनांक | निवड करणारे अधिकारी | निकाल सादर करावयाचा दिनांक |
| १. | सर्व परिक्षेत्रीय पोलीस महानिरिक्षक / उप महानिरिक्षक कार्यालये (एकूण ८) | १०.०१.२०२६ | पोलीस महासंचालक (उत्कृष्ट ४ परिक्षेत्रीय पोलीस महानिरिक्षक / उप महानिरिक्षक कार्यालये निवड करणे) | १४.०१.२०२६ |
| २. | पोलीस महासंचालक (उत्कृष्ट ४ परिक्षेत्रीय पोलीस महानिरिक्षक / उप महानिरिक्षक कार्यालये राज्यस्तरावरील निवडीसाठी QCI ला सादर करणे) | १४.०१.२०२६ | Quality Council of India (राज्य स्तरावर उत्कृष्ट २ परिक्षेत्रीय पोलीस महानिरिक्षक / उप महानिरिक्षक कार्यालयाची निवड करणे) | २३.०१.२०२६ |

| ८. राज्यस्तरीय आयुक्तालये/ संचालनालये यांच्या निवडीचे वेळापत्रक | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | सादर करणारी कार्यालये / अधिकारी | अंतिम सादरीकरण जमा करावयाचा दिनांक | निवड करणारे अधिकारी | निकाल सादर करावयाचा दिनांक |
| १. | सर्व विभागांची राज्यस्तरीय आयुक्तालये / संचालनालये (एकूण ६८) | १०.०१.२०२६ | महासंचालक, यशदा, पुणे ( उत्कृष्ट १५ आयुक्तालये / संचालनालयांची निवड करणे) | १४.०१.२०२६ |
| २. | महासंचालक, यशदा, पुणे (उत्कृष्ट १५ आयुक्तालये / संचालनालयांची राज्यस्तरावरील निवडीसाठी QCI ला सादर करणे) | १४.०१.२०२६ | Quality Council of India (राज्य स्तरावर उत्कृष्ट ७ आयुक्तालये / संचालनालयांची निवड करणे) | २३.०१.२०२६ |

| ९. राज्यस्तरीय महामंडळे, प्राधिकरणे, शासकीय / निमशासकीय संस्था, मंडळे व शासकीय कंपन्या यांच्या निवडीचे वेळापत्रक | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | सादर करणारी कार्यालये / अधिकारी | अंतिम सादरीकरण जमा करावयाचा दिनांक | निवड करणारे अधिकारी | निकाल सादर करावयाचा दिनांक |
| १. | सर्व मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे, शासकीय / निमशासकीय संस्था व कंपन्या (एकूण ९७) | १०.०१.२०२६ | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा) (उत्कृष्ट २० आयुक्तालये / संचालनालयांची निवड करणे) | १४.०१.२०२६ |
| २. | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा) (उत्कृष्ट २० मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे, शासकीय / निमशासकीय संस्था व कंपन्या राज्यस्तरावरील निवडीसाठी QCI ला सादर करणे) | १४.०१.२०२६ | Quality Council of India (राज्य स्तरावर उत्कृष्ट १० मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे, शासकीय / निमशासकीय संस्था व कंपन्या निवड करणे) | २३.०१.२०२६ |

| १०. मंत्रालयीन विभागांच्या निवडीचे वेळापत्रक | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | सादर करणारी कार्यालये / अधिकारी | अंतिम सादरीकरण जमा करावयाचा दिनांक | निवड करणारे अधिकारी | निकाल सादर करावयाचा दिनांक |
| १. | सर्व मंत्रालयीन विभाग (अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव) | १०.०१.२०२६ | मा. मुख्य सचिव (उत्कृष्ट १५ मंत्रालयीन विभागांची निवड करणे) | १४.०१.२०२६ |
| २. | मा. मुख्य सचिव (उत्कृष्ट १५ मंत्रालयीन विभाग राज्यस्तरावरील निवडीसाठी QCI ला सादर करणे) | १४.०१.२०२६ | Quality Council of India (राज्य स्तरावर उत्कृष्ट ७ मंत्रालयीन विभागांची निवड करणे) | २३.०१.२०२६ |